# “चला शाश्वत शेतकरी घडवूया”



“चला शाश्वत शेतकरी घडवूया” हा नारा देत गावोगावच्या शेतकऱ्यांना एकजुटीने शाश्वत शेती करण्याचे महत्व 'श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखाना लि. शिरोळ व ' डॉ. आप्पासाहेब ऊर्फ सा.रे. पाटील जयसिंगपूर उदगांव सहकारी बँक लि. जयसिंगपूर' यशस्वीरित्या पार पाडत आहे. सहकार्यातूनच आपण विकास साध्य करू शकतो हा विश्वास या क्षारपडमूक्त प्रकल्पाने निर्माण केला याचा मला अभिमान वाटतो.

शेतकऱ्यांच्या विकासासाठी निस्वार्थीपणे कष्ट घेणारी प्रत्येक विचार, व्यक्ती हि आपली आहे आणि त्यांच्या सहकार्यातूनच आपण संघटितपणे हे स्वप्न साकार करू शकतो हि जाणिव या प्रकल्पातून झाली. म्हणूनच या दत्त कारखानाच्याद्वारे राबवण्यात येत असलेल्या “क्षारपडमूक्त” प्रकल्प विकासाच्या कामांची शृंखला त्यांच्याद्वारे अविरत घडत आहे म्हणून हा प्रकल्प राबवण्यात येत आहे.

एकजुटीने शेतकऱ्यांचा विकास साध्य करत आपणासमोर आदर्श निर्माण करणारा हा क्षारपडमूक्तीचा प्रकल्प नक्कीच कौतूकास पात्र आहे. मला आशा आहे की आदर्श घ्यावा अशा शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे आणि आपण 'चला शाश्वत शेतकरी घडवूया' हे विचार प्रत्येक शेतकऱ्यांच्या विकासासाठी हातभार लावेल. 'क्षारपडमूक्त प्रकल्प' या विषयाबरोबर आरोग्य, शिक्षण, व्यवसाय अशा अनेक स्तरावर काम करत शेतकरी नक्कीच समृद्ध होतील.

शिरोळ तालुक्यातील बहुसंख्य गावांतील जमिनी क्षारपड बनल्या आहेत या जमिनी पुन्हा पिकवू बनवण्याचे कार्य श्री दत्त शेतकरी सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून केले. त्यास नवसंजीवनी रूप आले आहे. गेली अनेक वर्षे क्षारपड जमीन म्हणून सातबारावर नोंद आहे. मोहिमे अंतर्गत शेतकऱ्यांच्या सातबारावर पीक पाण्याची नोंद करण्याचे आदेश जिल्हाधिकारी दौलत देसाई साहेब यांनी यावेळी दिले. शिरोळ तालुक्यातील हसुर, अर्जुनवाड, कुटवाड, शेडशाळ या भागातील क्षारपड जमिन सुधारणा

केली आहे. त्याची पाहणी करण्यासाठी आले होते, डौलाने उभी असलेली पिके पाहून जिल्हाधिकारी दौलत देसाई यांनी भारावून गेले.

यावेळी माझ्यासोबत प्रांताधिकारी डॉ विकास खरात कारखान्याचे कार्यकारी संचालक एम व्ही पाटील संचालक भैय्यासाहेब पाटील, प्रमोद पाटील, विजय सूर्यवंशी, मुख्य शेती अधिकारी श्रीशैल हेगाणा, अधिकारी दिलीप जाधव, नायब तहसीलदार संजय काटकर, उत्तम कांबळे, शामराव पाटील, हसुरचे सरपंच बाबासाहेब सुतार, महादेव मेथे, शिवमूर्ती देशिंगे, रावसाहेब चौगुले, आप्पासो मडिवाळ, राजू तासगावे, अशोक शिरढोणे यांच्यासह शासकीय अधिकारी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



